राष्ट्रोद्धाराय तंत्र शिक्षणम्

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था/परवानगी/२०२१/ ६०९ दिनांक : 05 FEB 2021

प्रति,

प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित
पदवी व पदविका संस्था.

**विषय : या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना भेटण्यासाठी परवानगीबाबत...**

उपरोक्त विषयासंदर्भात असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याचशा संस्थांमधील / कार्यालयांमधील कर्मचारी संबंधित संस्था प्रमुखांची पूर्वपरवानगी न घेता परस्पर निम्नस्वाक्षरीकार, तसेच या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना भेटतात. अशा अचानक भेटीमुळे निम्नस्वाक्षरीकार व संबंधित अधिकारी / कर्मचा-यांच्या कामकाजाचा खोळंबा होतो व नाहक वेळ वाया जातो.

तरी याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, यापुढे आपल्या संस्थेतील ज्या अधिकारी / कर्मचा-यांना त्यांच्या शासकीय कामकाजाविषयी निम्नस्वाक्षरीकार, तसेच या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन वेळेत भेटावयाचे आहे, अशा कर्मचा-यांना आपल्या स्वाक्षरीचे परवानगी पत्र असल्याशिवाय त्यांना या कार्यालयात पाठवू नये. अशी संबंधित संस्था प्रमुखांची पूर्व परवानगी पत्र नसलेले जे अधिकारी / कर्मचारी या कार्यालयात येतील अशा अधिकारी / कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल याची त्यांनी नोंद घेण्याबाबत त्यांना सूचित करावे.

सदरचे परिपत्रक आपल्या संस्थेतील / कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याची पोहोंच घ्यावी

तसेच या कार्यालयातील ज्या कर्मचा-याकडे संबंधितांचे काम आहे, त्या कर्मचा-याकडे परस्पर न जाता संबंधित विभाग प्रमुखांकडे (कार्यालय अधिक्षक) / अधिका-यांकडे जाऊन कामाबाबत चौकशी करावी.

(डॉ. द. व्यं. जाधव),
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.
(२) या कार्यालयातील सर्व कर्मचा-यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

*E:\my documents\Misc.doc\103*